Registered No. B. 5.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 21ST OCTOBER 1897.

Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख २६ माहे जुलै सन १८९७.

नंबर ५१७९.—सरकारचा जाहिरनामा नंबर ४११६, तारीख ९ माहे जुलै सन १८८७ हा रद्द करून, आणि हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याचीं कलमें ५ व ७ यांवरून दिलेले अधिकार चालवून व गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन, आलिजाह् गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं बारी पदार्थ मुंबई इलाक्यांत तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांचें नियमन करण्याविषयीं खालीं दिलेल्या कानू केल्या आहेत.

बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याच्या संबंधाचा या कानूंतील कोणताही ठराव, सन १८८९ चा हिंदुस्थानचा बंदरांबाबदचा आक्ट यांत व्याख्या केलेल्या प्रकारच्या ज्या कोणत्याही बंदरासाठीं, स्थानिक सरकारानें, बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याचें नियमन करण्याविषयीं, हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याअन्वयें विशेष कानू केल्या असतील किंवा तें सरकार करील, त्या बंदरांत लागू होणार नाहीं.

जर कोणताही बारी पदार्थ—

(अ) सरकारच्या हुकुमावरून, अथवा

(ब) हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) हा अमलांत आणण्याच्या कामीं, अगर मागझीनचा रखवालदार, शिलपकार, लष्करी शिपाई, खलाशी अगर पोलीसचा मनुष्य, या नात्यानें अगर इतर रीतीनें सरकारांत नोकरीस असलेल्या, अगर इंडियन व्हालंटियर आक्ट (सन १८६९ चा २० वा) याअन्वयें व्हालंटियर ह्मणून पटांत दाखल केलेल्या कोणत्याही मनुष्यानें, त्या त्या नात्यानें आपली नोकरी अगर कामगिरी बजावीत असतांना,

तयार केला, कबज्यांत ठेविला, अगर विकला, तर त्या बाबतींत ह्या कानूंतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

### बारी पदार्थ मुंबई इलाक्यांत तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयीं, सन १८८४ चा बारी पदार्थांविषयींचा आक्ट याअन्वयें केलेल्या कानू.

#### प्रथमारंभींचे ठराव.

[कानू १, आणि बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याबाबदच्या व आयात करण्याबाबदच्या कानूंपैकीं कानू १, ह्या एकच आहेत.]

## तयार करणें, कबज्यांत ठेवणें, व विकणें.

### (अ) सामान्य कानू.

२. बारी पदार्थ तयार करणें तो फक्त, तो तयार करण्याबाबद ह्या कानूंअन्वयें दिलेल्या लैसेन्साच्या शर्तीअन्वयें व त्या शर्तीबरहुकूमच तयार केला पाहिजे :

मात्र ही कानू—

(अ) व्यावहारिक उपयोगासाठीं किंवा विकण्यासाठीं नसून, रसायनशास्त्रसंबंधी प्रयोग करण्याच्या कारणासाठीं असेल असा थोडासा बारी पदार्थ करण्याच्या बाबतींत, किंवा

(ब) जितकीं सेफ्टी काडतुसें खासगी उपयोगासाठीं कबज्यांत ठेवण्याची ह्या कानूंवरून परवानगी आहे त्या मानापर्यंत कोणतींही सेफ्टी काडतुसें, विकण्यासाठीं नव्हत, पण खासगी उपयोगासाठीं भरण्याच्या बाबतींत,

लागू होणार नाहीं.

३. जो कोणताही मनुष्य, २ऱ्या कानूविरुद्ध एकादा बारी पदार्थ तयार करील, तो तीन हजार रुपयांपर्यंत दंडास प्राप्त होईल.

४. बारी पदार्थ कबज्यांत ठेवणें तो, तो कबज्यांत ठेवण्याबाबद ह्या कानूंअन्वयें दिलेल्या लैसेन्साच्या शर्तीअन्वयें व त्या शर्तीबरहुकूम असल्याखेरीज इतर रीतीनें ठेवितां कामा नये :

मात्र ही कानू—

(१) कोणी मनुष्य, विकण्याकारितां नसून आपल्या खासगी उपयोगाकरितां—

(अ) एकाच जागीं ३० रत्तलांहून अधिक नाहीं इतकी बंदुकीची दारू, किंवा तितक्या बंदुकीच्या दारूच्या-बदला १९ रत्तल दुसरा कोणताही बारी पदार्थ, किंवा सदरहूपेक्षां जितकी कमी बंदुकीची दारू याप्रमाणें कबज्यांत ठेविली नसेल तिच्याबदला, त्या मानाच्या निमे दुसरा बारी पदार्थ, अथवा

(ब) १९० रत्तलांहून अधिक नाहीं इतकी सेफ्टी काडतुसांत भरलेली बंदुकीची दारू, किंवा तिच्याबदला ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला १९० रत्तल कोणताही बारी पदार्थ, किंवा सदरहूपेक्षां जितकी कमी बंदुकीची दारू याप्रमाणें कबज्यांत ठेविली नसेल तिच्याबदला, तितकाच याप्रमाणें भरलेला कोणताही बारी पदार्थ,

कबज्यांत ठेवील त्या मनुष्यास लागू होणार नाहीं :

**अपवाद.**—या कानूंतील विशेष ठरावाच्या सदरहू भागांतील कोणत्याही ठरावावरून—

(अ) ९ व्या ( फल्मिनेटच्या ) वर्गाचा कोणताही बारी पदार्थ, किंवा

(ब) जो कोणताही बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याची, हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट ( सन १८८४ चा ४ था ) याच्या ६ व्या कलमाअन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध करून निखालस मनाई केलेली असेल तसा बारी पदार्थ, किंवा

(क) जेव्हां एकादा बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याची त्या कलमाअन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध करून शर्तीनिशीं मनाई केली असेल, तेव्हां त्या शर्तीस पात्र राहिल्यावांचून तसा कोणताही बारी पदार्थ,

खासगी उपयोगासाठीं कबज्यांत ठेवण्याचा अधिकार प्राप्त होतो असें समजूं नये :

(२) तसेंच, दारूकाम तत्काल उपयोगाकरितां मिळविलेलें व योजिलेलें असून तें विकण्याकरितां नसेल तर, व तें १४ दिवसांहून अधिक नाहीं अशा कोणत्याही मुदतीपर्यंत निर्भय व योग्य जागेंत, व लोकांच्या सुरक्षितपणासाठीं सर्व योग्य बंदोबस्तानिशीं, ठेवलें असेल तर, तें वाटेल तितकें कबज्यांत ठेवण्यास,

(३) जेव्हां कोणताही बारी पदार्थ, एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याबाबद हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट ( सन १८८४ चा ४ था ) याअन्वयें केलेल्या कानूंतील ठरावांबरहुकूम ठेविला असेल किंवा एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यांत येत असेल त्या प्रसंगीं, तो पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याच्या कारणासाठीं हुंडेकऱ्यानें किंवा दुसऱ्या मनुष्यानें कबज्यांत ठेवण्यास, किंवा

(४) त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या व्यापारी लोकांच्या तारवांविषयींच्या आक्टांतील किंवा त्या आक्टां-अन्वयें केलेल्या कोणत्याहि हुकुमांतील किंवा नियमांतील ठरावांप्रमाणें कोणत्याही तारवावर कोणतीही बंदुकीची दारू, बाण किंवा दुसरा बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्यासही,

सदरहू कानू लागू होणार नाहीं.

५. जो कोणताही मनुष्य ४ थ्या कानूविरुद्ध एकादा बारी पदार्थ कबज्यांत ठेवील, तो एक हजार रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल.

६. बारी पदार्थ विकणें तो फक्त, तो विकण्याबाबद ह्या कानूंअन्वयें दिलेल्या लैसेन्सच्या शर्तींअन्वयें व त्या शर्तींबरहुकूमच विकला पाहिजे:

मात्र कोणा मनुष्याच्या कबज्यांत त्याच्या खासगी उपयोगासाठीं कोणताही बारी पदार्थ कायदेशीर रीतीनें असून तो त्यानें, तो पदार्थ कबज्यांत ठेवण्याची ज्यास कायदेशीर रीतीनें मनाई नाहीं अशा कोणत्याही मनुष्यास विकला असतां, याप्रमाणें विकणाऱ्या मनुष्यास ही कानू लागू होणार नाहीं.

७. जो कोणताही मनुष्य ६ व्या कानूविरुद्ध एकादा बारी पदार्थ विकील, तो पांचशें रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल.

## (ब) बंदुकीची दारू व कित्येक बारी पदार्थ तयार करण्याविषयीं, कबज्यांत ठेवण्याविषयीं व विकण्याविषयीं लैसेन्स देणें.

८. लैसेन्स देणारा अमलदार, लैसेन्स चालू असल्या मुदतींत असावयाचें जें एकंदर मान पसंत करील त्यापर्यंत व तो पसंत करील तशा जागांमध्यें, १ ल्या ( बंदुकीच्या दारूच्या ) वर्गाचा, किंवा ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागाचा, किंवा ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाचा एकादा बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयींचें, अगर कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयींचें, अगर कबज्यांत ठेवण्याविषयींचें लैसेन्स देण्याचा अधिकार इलाका-शहरांत व त्याच्या पोटगांवांत पोलीस कमिशनरास, आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटास आहे:

मात्र, अशा कोणत्याही लैसेन्सांतील कोणत्याही ठरावावरून, तो लैसेन्स धारण करणारास, ज्या जागेस तो लैसेन्स लागू असेल त्या जागेंत, एकाच वेळीं, २०० हून अधिक रत्तल बंदुकीची दारू, ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला ५०० हून अधिक रत्तल बारी पदार्थ, आणि २०० हून अधिक रत्तल दारू-काम, अथवा लैसेन्स देणारा अमलदार या बाबतींत ह्या बारी पदार्थांपैकीं कोणत्याही पदार्थाचें जें कोणतेंही सदरहू-पेक्षां कमी मान फर्मावील त्याहून अधिक बारी पदार्थ ठेवण्याचा हक्क प्राप्त होतो असें समजूं नये.

९. सदरील शेवटल्या कानूअन्वयें दिलेल्या प्रत्येक लैसेन्साबद्दल खालीं लिहिलेल्या फी दिल्या पाहिजेत. त्या येणेंप्रमाणें:—

(१) सदरील शेवटच्या कानूंत जें परमावधीचें मान सांगितलें आहे त्या मानापर्यंत किंवा त्याहून कोणत्याही कमी मानापर्यंत बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयींच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल वीस रुपये फी;

(२) सदरील शेवटच्या कानूंत जें मान सांगितलें आहे त्याच्या निमे मानापर्यंत किंवा त्याहून कोणत्याही कमी मानापर्यंत बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयींच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल दहा रुपये फी;

(३) सदरील शेवटच्या कानूंत जें मान सांगितलें आहे त्याच्या चतुर्थांश मानापर्यंत किंवा त्याहून कोणत्याही कमी मानापर्यंत बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयींच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल पांच रुपये फी;

(४) सदरील शेवटच्या कानूंत जें परमावधीचें मान सांगितलें आहे त्या मानापर्यंत किंवा त्याहून कोणत्याही कमी मानापर्यंत बारी पदार्थ कबज्यांत ठेवणें व विकणें याबद्दल दहा रुपये फी;

(५) सदरील शेवटच्या कानूंत जें मान सांगितलें आहे त्याच्या निमे मानापर्यंत किंवा त्याहून कोणत्याही कमी मानापर्यंत बारी पदार्थ कबज्यांत ठेवणें व विकणें याबद्दल पांच रुपये फी;

(६) सदरील शेवटल्या कानूंत जें मान सांगितलें आहे त्याच्या चतुर्थांश मानापर्यंत किंवा त्याहून कोणत्याही कमी मानापर्यंत बारी पदार्थ कबज्यांत ठेवणें व विकणें याबद्दल दोन रुपये आठ आणे फी; आणि

(७) बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयींच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल आठ आणे फी.

१०. ८ व्या कानूअन्वयें द्यावयाचा प्रत्येक लैसेन्स, या कानूंस जोडलेल्या परिशिष्टांतील, प्रसंगानुरूप, अ, ब किंवा क, या नमुन्याप्रमाणें असून, तो त्यांत सांगितलेल्या शर्तींस पात्र असला पाहिजे.

११. ८ व्या कानूखालील लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तींस पात्र करून दिला असेल, ती शर्त मोडणारा मनुष्य पांचशें रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल.

### (क) इतर बारी पदार्थ तयार करण्याविषयीं लैसेन्स देणें.

१२. ८ व्या कानूंत सांगितलेल्या बारी पदार्थांखेरीज इतर बारी पदार्थ तयार करण्याविषयीं लैसेन्स देणें ते, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे प्रत्येक बाबतींत ज्या फी, जो नमुना, जी मुदत, आणि ज्या शर्ती ठरवितील त्या फी दिल्यावर, तशा नमुन्याप्रमाणें, तशा मुदतीचे आणि तशा शर्तींस पात्र करून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे देतील.

मात्र, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, अशा कोणत्याही बारी पदार्थ तयार करण्याविषयींच्या लैसेन्साच्या बाबतींत, तो लैसेन्स ज्या प्रकारच्या व जितक्या बारी पदार्थांबाबद असेल त्याच प्रकारचा व तितकाच बारी पदार्थ कबज्यांत ठेविण्याविषयींच्या लैसेन्सांकरितां यांत पुढें ज्या शर्ती ठरविल्या आहे त्या सर्व शर्ती ठरविल्या पाहिजेत.

१३. १२ व्या कानूखालील लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तींस पात्र करून दिला असेल, ती शर्त मोडणारा मनुष्य तीन हजार रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल.

### (ड) इतर बारी पदार्थ थोडक्या मानानें कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स देणें.

१४. ८ व्या कानूंत निर्दिष्ट केलेल्या बारी पदार्थांखेरीज दुसरे बारी पदार्थ, लैसेन्स देणारा अमलदार पसंत करील तशा जागांमध्यें कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स देण्याचा अधिकार, ते पदार्थ ९ व्या (फल्मिनेटच्या) वर्गाचे नसतील आणि ते एकाच वेळीं ६० रत्तलांहून अधिक मानापर्यंत कबज्यांत ठेवावयाचे नसतील, तर इलाका-शहरांत व त्याच्या पोटगांवांत पोलीस कमिशनरास आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटास आहे.

१५. १४ व्या कानूअन्वयें द्यावयाचा प्रत्येक लैसेन्स या कानूंस जोडलेल्या परिशिष्टांतील ड नमुन्याप्रमाणें असून, तो त्यांत सांगितलेल्या शर्तींस पात्र असला पाहिजे. अशा प्रत्येक लैसेन्साबद्दल पांच रुपये फी दिली पाहिजे.

१६. १४ व्या कानूखालील लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तींस पात्र करून दिला असेल, ती शर्त मोडणारा मनुष्य एक हजार रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल.

### (इ) साधारणतः बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स देणें.

१७. कानू ८ व १४ यांअन्वयें जे लैसेन्स देतां येतील त्यांखेरीज बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स देणें ते, ते बारी पदार्थ ९ व्या (फल्मिनेटच्या) वर्गाचे नसतील तर, खालीं लिहिलेल्या काम चालविण्याच्या रीतीबरहुकूम स्थानिक सरकाराकडून देण्यांत येतील :—

(१) अर्जदारानें जिल्हा-माजिस्ट्रेटास, किंवा इलाका-शहरांत व त्याच्या पोटगांवांत पोलीस कमिशनरास, लेखी अर्ज सादर केला पाहिजे, आणि त्या अर्जाबरोबर, ज्या जागेंत बारी पदार्थ ठेवण्याचें योजलें असेल (अशा जागेस यांत मागझीन असें ह्मटलें आहे) त्या जागेचा व तिच्या स्थानाचा (यथामान काढलेला) नकाशा असला पाहिजे.

(२) त्या अर्जांत, खालीं लिहिलेल्या गोष्टींपैकीं ज्या गोष्टी लागू असतील त्या निर्दिष्ट केल्या पाहिजेत :—

(अ) जी जमीन त्या मागझीनचें स्थान असेल त्या जमिनीच्या सीमा, आणि त्या स्थानाच्या सभोंवतालची जी जमिनीची कोणतीही पट्टी मोकळी ठेवावयाची असेल ती जमिनीची पट्टी, व ज्या इमारतींपासून व कामांपासून तें स्थान अलग ठेवावयाचें असेल त्या इमारती व कामें, अथवा मागझीन, किंवा त्याचा कोणताही भाग, आणि दुसऱ्या इमारती व कामें यांच्यामध्यें ठेवावयाचीं अंतरें ;

[ ह्यासंबंधानें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या मंजुरीनें स्थानिक सरकारनें कमींत कमी अंतरांचें कोष्टक ठरविलें असेल, तर, मागझीन आणि निरनिराळ्या प्रकारच्या इमारती यांच्या दरम्यान अंतरें ठेवावयाचीं तीं, अंतरांच्या सरकारी यादींत त्या बारी पदार्थांच्या संबंधानें (तो योजिलेल्या मानापर्यंत सांठवून ठेवलेला असेल तेव्हां) जीं अंतरें निर्दिष्ट केलेलीं असतील त्यांहून कमी असूं नयेत. ]

(ब) मागझीनवरील किंवा मागझीनच्या संबंधाचे सर्व बांध, इमारती व कामें यांचें स्थान, प्रकार व बांधणी, आणि त्यांचीं एकमेकांपासून अंतरें;

(क) मागझीनच्या सीमांच्या आंत एकाच वेळीं जे बारी पदार्थ, व त्यांचीं सर्वांशीं किंवा अंशतः मिश्र केलेलीं जीं द्रव्यें ठेवूं द्यावयाचीं असतील त्यांचें मान; आणि

(ड) प्रदेश, कोणत्याही इमारतींचें किंवा कामांचें स्थान किंवा बांधणी, किंवा कोणत्याही क्रियेचें स्वरूप, यामुळें किंवा इतर प्रकारें उत्पन्न होणाऱ्या कोणत्याही विशेष गोष्टींच्या कारणानें अर्जदारास ज्या कोणत्याही विशेष अटी योजणें असेल त्या अटी.

(३) सदरहू अर्जी पोंहचल्यावर—

(अ) प्रसंगाप्रमाणें, जिल्हा माजिस्ट्रेटानें किंवा पोलीस कमिशनरानें त्या अर्जीबाबद नोटीस प्रसिद्ध करविली पाहिजे, आणि योजलेल्या स्थानीं मागझीन स्थापण्यास जीं मनुष्यें हरकत सांगत असून ज्यांनीं हजर होऊन हरकत सांगण्याच्या आपल्या इराद्याबाबद एक नोटीस, तींत आपलीं नांवें, पत्ते व धंदे, आणि आपल्या हरकतीच्या सबबींचा थोडक्यांत तपशील हीं लिहून, सुनावणीच्या तारखेपूर्वीं निदान निव्वळ सात दिवस अगोदर, सदरहू जिल्हा माजिस्ट्रेटास किंवा पोलीस कमिशनरास आणि अर्जदारास दिली असेल, त्यांच्या हरकतींची सुनावणी करण्यासाठीं एक तारीख नेमली पाहिजे.

(ब) जेव्हां योजलेल्या मागझीनचें स्थान कोणत्याही म्युनिसिपालिटीच्या किंवा कोणत्याही बंदर अधिकाऱ्याच्या अखत्यारींतील प्रदेशाच्या हद्दींत किंवा त्या हद्दींपासून एक मैलाच्या आंत असेल, तेव्हां अर्जदारानें अशा म्युनिसिपालिटीवर किंवा अधिकाऱ्यावर सदरहू अर्जीबाबद, व जिल्हा माजिस्ट्रेटानें किंवा पोलीस कमिशनरानें सुनावणी करण्यासाठीं नेमलेल्या तारखेबाबद, नोटीस बजाविली पाहिजे.

(क) सदरहू नोटिसा जिल्हा माजिस्ट्रेट किंवा पोलीस कमिशनर यानें सुनावणीच्या तारखेपूर्वीं निदान एक महिना अगोदर, अर्जदाराच्या खर्चानें, प्रसिद्ध केल्या पाहिजेत व बजाविल्या पाहिजेत.

(ड) जिल्हा माजिस्ट्रेटास किंवा पोलीस कमिशनरास अर्जी केल्यानंतर होईल तितक्या लवकर त्यानें सुनावणी करण्याची तारीख नेमली पाहिजे, आणि याप्रमाणें नेमावयाची वेळ, अर्जदारानें नोटिसा प्रसिद्ध केल्यापासून व बजाविल्यापासून जावयाचा सदरहू महिना संपल्यानंतर होईल तितकी लवकरची असली पाहिजे.

(इ) अर्जीचा विचार केल्यावर, आणि जरूर वाटेल तशी चौकशी केल्यावर, जिल्हा माजिस्ट्रेट किंवा पोलीस कमिशनर हा योजलेल्या स्थानीं असें नवीन मागझीन स्थापण्याविषयीं संमति मुळींच न देण्यास; किंवा अटींवांचून, अगर जास्त यत्ता किंवा पूर्वोपाय यांबाबदच्या कोणत्याही शर्ती नमूद करून, त्याविषयीं संमति देण्यास मुखत्यार आहे.

(फ) चौकशी पुरी झाल्यावर जिल्हा माजिस्ट्रेटानें किंवा पोलीस कमिशनरानें आपल्या शिफारशीसहित ती अर्जी स्थानिक सरकारास पाठविली पाहिजे. मग त्या स्थानिक सरकारास, मागितलेला लैसेन्स, जिल्हा माजिस्ट्रेटाच्या किंवा पोलीस कमिशनराच्या शिफारशीप्रमाणें, किंवा योग्य वाटतील तशा जास्त यत्तांनिशीं किंवा पूर्वोपायांनिशीं देण्याचा अधिकार आहे, किंवा तो देण्यास इनकार करण्याचा अधिकार आहे.

मात्र, योजिलेल्या मागझीनचें अंतर कोणत्याही राहावयाच्या घरापासून, भररस्त्यापासून, स्ट्रीटपासून, रहदारीच्या सार्वजनिक मार्गापासून अगर सार्वजनिक जागेपासून २०० यार्डांहून कमी असेल तर, अगर इतर कोणत्याही कारणासाठीं, बारी पदार्थांच्या एखाद्या इन्स्पेक्टराकडून ती जागा तपासवून त्याचें मत घेणें इष्ट आहे असें स्थानिक सरकारास वाटेल तर, त्या सरकारानें, लैसेन्स देण्याच्या आधीं तसें मत घेतलें पाहिजे.

राखावयाच्या अंतरांचें कोष्टक ठरविलेलें असल्यास, त्या बाबतींत ह्याप्रमाणें ठरविलेल्या कमींत कमी अंतराबाबदचे ठराव तोडण्यांत आलेले नाहींत हें पाहिलें ह्मणजे बस होईल:

मात्र, तो अर्ज अंतरांचें सदरहू कोष्टक निघण्याच्या आधीं दिलेला लैसेन्स नवीन करून देण्याबाबद असेल, तर बारी पदार्थांच्या इन्स्पेक्टरानें, तो लैसेन्स त्याप्रमाणें नवीन करून देण्यांत धोका नाहीं असा सल्ला दिल्यास, स्थानिक सरकारानें, अंतरांच्या कोष्टकाप्रमाणें वागण्याविषयीं न फर्माविता तो लैसेन्स नवीन करून दिला असतां चालेल.

(ग) स्थानिक सरकारानें लैसेन्स दिला, तर त्या सरकारानें तो जिल्हा माजिस्ट्रेटाकडे किंवा पोलीस कमिशनराकडे पाठविला पाहिजे, आणि मागझीनचा उपयोग करणें वाजवी होईल इतक्या पुऱ्या रीतीनें तें मागझीन त्या लैसेन्साप्रमाणें तयार केलें आहे अशी त्या जिल्हा माजिस्ट्रेटाची किंवा पोलीस कमिशनराची खात्री झाल्यास त्यानें तो लैसेन्स बहाल केला पाहिजे; परंतु याप्रमाणें बहाल होई तोंपर्यंत तो लैसेन्स अमलांत येणार नाहीं.

१८. १७ व्या कानूअन्वयें द्यावयाच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल २० रुपये फी दिली पाहिजे.

१९. १७ व्या कानूअन्वयें द्यावयाचा प्रत्येक लैसेन्स या कानूंस जोडलेल्या परिशिष्टांतील ई नमुन्याप्रमाणें असून, तो त्यांत सांगितलेल्या शर्तींस पात्र राहील.

१९ अ.—हिंदुस्थान सरकारच्या पूर्व मंजुरीनिशीं, आणि जरूर वाटतील त्या कोणत्याही शर्तींस अगर यत्तांस पात्र करून, स्थानिक सरकारास, एकाद्या तरत्या मागझीनमध्यें कानू १७ अन्वयें बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याबद्दल अधिकार देण्याचा, आणि अशा विशेष प्रसंगीं, १७ व्या कानूंत सांगितलेल्या काम चालविण्याच्या रीतींत आणि नमुना ई प्रमाणें द्यावयाच्या लैसेन्सांत जरूर लागतील ते फेरफार करण्याविषयीं फर्मावण्याचा अखत्यार आहे.

२०. १७ व्या कानूखालील लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तींस पात्र करून दिला असेल, त्या शर्तीं मोडणारा मनुष्य एक हजार रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल.

२१. ९ व्या (फल्मिनेटच्या) वर्गाचे बारी पदार्थ कबज्यांत ठेविण्याविषयींचे लैसेन्स देणें ते, ज्या फी व जो नमुना व ज्या शर्ती प्रत्येक बाबतींत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे ठरवितील त्या फी दिल्यावर, त्या नमुन्याप्रमाणें व त्या शर्तींस पात्र करून, त्यांजकडून देण्यांत येतील.

२२. २१ व्या कानूखालील लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तींस पात्र करून दिला असेल, ती शर्त मोडणारा मनुष्य एक हजार रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल.

### (इ) इतर बारी पदार्थ विकण्याविषयीं लैसेन्स देणें.

२३. ८ व्या कानूंत सांगितलेल्या बारी पदार्थांखेरीज इतर बारी पदार्थ विकण्याबद्दलचे लैसेन्स, ते बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स दिलेल्या कोणत्याही मनुष्यास देण्याचा अधिकार, इलाका-शहरांत आणि त्याच्या पोटगांवांत पोलीस कमिशनरास व इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटास आहे.

२४. २३ व्या कानूअन्वयें दिलेल्या प्रत्येक लैसेन्साबद्दल पांच रुपये फी दिली पाहिजे.

२५. २३ व्या कानूअन्वयें द्यावयाचा प्रत्येक लैसेन्स या कानूंस जोडलेल्या परिशिष्टांतील फ नमुन्याप्रमाणें असून, तो त्यांत सांगितलेल्या शर्तींस पात्र राहील.

२६. २३ व्या कानूखालील लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तींस पात्र करून दिला असेल, ती शर्त मोडणारा मनुष्य पांचशें रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल.

### (फ) पुरवणी ठराव.

२७. खालीं सांगितलेल्या अमलदारांस, त्यांच्या त्यांच्या बाबतींत खालीं निर्दिष्ट केलेल्या प्रदेशांमध्यें, खालीलप्रमाणें करण्याचा अखत्यार आहे, ह्मणजे:—

(अ) ज्या कोणत्याही जागेमध्यें, गाडीमध्यें अगर तारवामध्यें हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) ह्याअन्वयें दिलेल्या लैसेन्साबरहुकूम कोणताही बारी पदार्थ तयार करण्यांत येत आहे, कबज्यांत ठेवण्यांत येत आहे, उपयोगांत आणण्यांत येत आहे, विकण्यांत येत आहे, एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यांत येत आहे, अगर आयात करण्यांत येत आहे, अगर ज्या जागेमध्यें, गाडीमध्यें अगर तारवामध्यें सदरहू आक्टाविरुद्ध किंवा त्याअन्वयें केलेल्या कानूंविरुद्ध बारी पदार्थ तयार करण्यांत आला आहे अगर येत आहे, कबज्यांत ठेविलेला आहे, अगर ठेवण्यांत येत आहे, उपयोगांत आणण्यांत

आला आहे अगर येत आहे, विकण्यांत आला आहे अगर येत आहे, एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यांत आला आहे अगर येत आहे, अगर आयात करण्यांत आला आहे अगर येत आहे असें वाटण्यास सदरहू अमलदारांस कारण असेल, त्या जागेंत, गाडींत अगर तारवांत शिरून त्याची पाहाणी आणि तपासणी करण्याचा अख्त्यार आहे;

(ब) त्यांमध्यें बारी पदार्थ शोधण्याचा अखत्यार आहे;

(क) त्यांमध्यें सांपडलेल्या कोणत्याही बारी पदार्थांचे नमुने त्यांची किंमत देऊन घेण्याचा अख्त्यार आहे; आणि

(ड) त्यांमध्यें सांपडलेल्या ज्या कोणत्याही बारी पदार्थासंबंधानें सदरहू आक्टाच्या अगर त्याअन्वयें केलेल्या कानूंच्या ठरावांचा भंग झालेला आहे असें वाटण्यास कारण असेल, तेव्हां तो पदार्थ आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें धरण्याचा, अटकावून ठेवण्याचा, काढून नेण्याचा, आणि, सार्वजनिक सुरक्षितपणासाठीं आवश्यक असल्यास, त्याचा नाश करण्याचा अख्त्यार आहे.

| प्रदेश. | अमलदार. |
|---|---|
| मुंबई इलाक्याच्या सर्व भागांत ... ... ... | खडकी येथील गन्पौडर फ्याक्टरीचे सुपरिंटेंडंट.<br>खडकी येथील गन्पौडर फ्याक्टरीचे असिस्टंट सुपरिंटेंडंट. |
| आपापल्या जिल्ह्यांत ... ... ... ... | सर्व जिल्हा माजिस्ट्रेट. |
| आपापल्या अधिकाराखालील प्रदेशांत ... ... | जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील सर्व माजिस्ट्रेट. |
| मुंबई शहर व त्याचीं पोटगांवें यांत ... ... | पोलीस कमिशनर, मुंबई, आणि इन्स्पेक्टरच्या दर्ज्याहून कमी दर्ज्याचे नाहींत अशा पोलीस अमलदारांला पोलीस कमिशनर ह्यासंबंधानें मुद्दाम नेमील, तर ते सर्व पोलीस अमलदार. |

मात्र इतकेंच कीं—

(१) जेव्हां जेव्हां खडकी येथील गन्पौडर फ्याक्टरीचे सुपरिंटेंडंट अगर असिस्टंट सुपरिंटेंडंट, किंवा जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील कोणताही माजिस्ट्रेट असा कोणताही बारी पदार्थ धरील, अटकावून ठेवील, किंवा काढून नेईल, तेव्हां तेव्हां त्यानें त्या गोष्टीबद्दल जिल्हा माजिस्ट्रेटाकडे रिपोर्ट केला पाहिजे; आणि

(२) सदरहू फ्याक्टरीच्या सुपरिंटेंडंटानें किंवा असिस्टंट सुपरिंटेंडंटानें, अगर तसेंच जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील कोणत्याही माजिस्ट्रेटानें, जिल्हा माजिस्ट्रेटाची आधीं मंजुरी घेतल्याशिवाय, अशा कोणत्याही बारी पदार्थाचा नाश करतां कामा नये.

२८. ज्या कोणा मनुष्यास एकादा बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स मिळालेला असेल, तो आपल्या मागझीनच्या किंवा लैसेन्स दिलेल्या जागेच्या संबंधानें लहान हत्यारां [स्माल आर्म्स्] करितां त्या बारी पदार्थानें कोणतेंही काडतूस विकण्यासाठीं किंवा इतर कारणासाठीं भरतो या कारणावरून, त्यास तो बारी पदार्थ तयार करण्याबद्दल लैसेन्स घ्यावा लागणार नाहीं :

मात्र त्यानें खालील नियम पाळले पाहिजेत. ते येणेंप्रमाणें:—

(१) ज्या खोलींत याप्रमाणें काडतुसें भरण्याचें काम करण्यांत येत असेल त्या खोलींत पांच रत्तलांहून अधिक बंदुकीची दारू, किंवा स्थानिक सरकार या बाबतींत ठरवील त्या मानाहून अधिक इतर कोणताही बारी पदार्थ असतां कामा नये; परंतु अशी दारू किंवा पदार्थ हीं सेफ्टी काडतुसांमध्यें भरलेलीं असल्यास तीं त्या खोलींत त्या परिमाणाहून अधिक असण्यास हरकत नाहीं.

(२) सदरहूप्रमाणें काडतुसें भरण्याच्या संबंधाचें नसलेलें कोणतेंही काम, सदरहूप्रमाणें भरण्याचें काम चालत असेल त्या वेळीं, सदरहू खोलींत चालवितां कामा नये;

(३) सदरहूप्रमाणें काडतुसें भरण्याचें काम चालू असतांना त्या खोलींत कोणताही विस्तव असतां कामा नये, किंवा आगीचा अगर भडका होण्याचा धोका ज्यापासून उत्पन्न होणार नाहीं अशा रचनेचा, अशा जागीं असलेला किंवा अशा प्रकारचा दिवा शिवायकरून इतर कोणताही कृत्रिम उजेड असतां कामा नये;

(४) सदरहूप्रमाणें काडतुसें भरण्याचें काम ज्या खोलींत चालू असेल ती खोली मागझीनपासून सुटी, परंतु त्याच्या अगदीं शेजारीं असून, लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्यानें त्या लैसेन्सवर जें अंतर निर्दिष्ट केलें असेल तितक्या अंतरावर असली पाहिजे; आणि

(५) सदरहू खोलीचा भोगवटा करणारानें, त्याचा लैसेन्स ज्या अधिकाऱ्यानें दिलेला असेल त्या अधिकाऱ्यास, आपणास ह्या कानूंत ज्याप्रमाणें काडतुसें भरण्याची मोकळीक दिलेली आहे त्याप्रमाणें तीं भरण्याच्या आपल्या इराद्याबद्दल नोटीस दिली पाहिजे.

२८ अ.—बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याबद्दल लैसेन्स दिलेल्या मनुष्याला, तो आपल्या मागझीनसंबंधानें किंवा लैसेन्स दिलेल्या जागेसंबंधानें, केवळ आपल्या खाणींत किंवा आपण करीत असलेल्या किंवा आपल्या निर्बंधांत असलेल्या कोणत्याही खोदणीच्या किंवा इतर कामांत उपयोगासाठीं, सदरहू बारी पदार्थ, काडतुसें भरून, चार्ज करून, सुकवून, चाळून, बसवून किंवा इतर रीतीनें उपयोगीं पडण्यासारखा करतो किंवा तयार करतो, या कारणावरून त्याला तयार करण्याबद्दल लैसेन्स घेणें भाग पडणार नाहीं:

मात्र त्यानें खालील नियम पाळले पाहिजेत. ते येणेंप्रमाणें:—

(१) ज्या वर्कशापमध्यें सदरहू प्रकारें बारी पदार्थ तयार करण्याचें काम चाललेलें असेल, त्यांत १०० रत्तलांहून अधिक बंदूकाची दारू, किंवा स्थानिक सरकार या बाबतींत ठरवील त्या मानाहून अधिक इतर कोणताही बारी पदार्थ असतां कामा नये;

(२) अशा वर्कशापमध्यें सदरहू प्रकारें तयार करण्याचें काम चालू असतांना, तेथें त्या कामाशीं संबंध नाहीं असें कोणतेंही काम करतां कामा नये;

(३) सदरहू वर्कशाप, मागझीनपासून सुटें, परंतु त्याच्या अगदीं शेजारीं, लैसेन्स देणारा अधिकारी त्या लैसेन्सवर निर्दिष्ट करील तितक्या अंतरावर, असलें पाहिजे;

(४) एका प्रकारच्या बारी पदार्थाचें रूपांतर करून त्याचा दुसऱ्या प्रकारचा बारी पदार्थ करतां कामा नये, किंवा त्याचें पृथक्करण करतां कामा नये किंवा त्याचे घटकावयव निरनिराळे करतां कामा नये; आणि

(५) त्या वर्कशापचा भोगवटा करणारानें, या कानूंत मोकळीक असल्याप्रमाणें बारी पदार्थ उपयोगीं पडण्यासारखा किंवा तयार करण्याचें काम चालविण्याचा आपला इरादा असल्याबद्दल लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्याला नोटीस दिली पाहिजे.

## सामान्य.

२९. ह्या कानूंखालील प्रत्येक लैसेन्स ज्या शर्तींस पात्र करून दिला असेल त्यांपैकीं कोणतीही शर्त मोडली असतां, त्यावरील हक्क बुडला जाण्यास पात्र होईल.

३०. बारी पदार्थ तयार करण्यास, कबज्यांत ठेवण्यास किंवा विकण्यास लैसेन्स मिळालेला कोणी मनुष्य मरण पावेल किंवा दिवाळें काढील, किंवा मनानें नालायक अगर इतर रीतीनें असमर्थ होईल, तर अशा लैसेन्सवाल्याचें काम चालविणारा मनुष्य, त्याला अवल लैसेन्सच्या शिलक राहिलेल्या मुदतींत आपल्या स्वतःच्या नांवानें नवीन लैसेन्स मिळण्यासाठीं लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्याकडे अर्जी करण्यास जो वेळ वाजवी रीतीनें जरूर असेल, तेवढ्या वेळांत सदरहू लैसेन्सअन्वयें काम चालविण्याबद्दल किंवा काम करण्याबद्दल, हिंदुस्थानचा बारी पदार्थविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) किंवा त्याखालील कानू यांअन्वयें कोणत्यांही शिक्षेस, किंवा सदरहू हक्क बुडला जाण्यास, पात्र होणार नाहीं. असा नवीन लैसेन्स एक रुपया दिल्यावर देण्यांत येईल.

३१. ह्या कानूंअन्वयें घ्यावयाच्या फी वठविलेल्या स्टांपांच्या रूपानें घेतल्या पाहिजेत. लैसेन्सांबद्दलच्या किंवा लैसेन्स नवीन करून देण्याबद्दलच्या अर्ज्या, दुसऱ्या रीतीनें ठराव केला नसेल तर, साध्या कागदावर लिहिल्या पाहिजेत, आणि लैसेन्स देणें ते, अशा लैसेन्सांबाबद किंवा ते नवीन करून देण्याबाबद घ्यावयाच्या फीच्या रकमेइतक्या किंमतीच्या वठविलेल्या स्टांपांवर दिले पाहिजेत.

३२. कानू १२ अन्वयें बारी पदार्थ तयार करण्याविषयींचे, किंवा २१ व्या कानूअन्वयें ९ व्या (फलिमेटच्या) वर्गाचे बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयींचे लैसेन्स खेरीज करून इतर सर्व लैसेन्सांची मुदत, ज्या वर्षाबाबद ते दिले असतील त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस संपेल. १२ व्या व २१ व्या कानूअन्वयें दिलेले लैसेन्स त्यांमध्यें निर्दिष्ट केलेल्या मुदतीपर्यंत चालू राहतील. परंतु लैसेन्साची मुदत वाढविणें असेल तर ती, नवीन

लैसेन्स देण्यास सदरहू आक्ट व कानू यांअन्वयें अधिकार प्राप्त न होई इतकें किंवा तो देण्यास हरकत आहे असें लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्यांना वाटे इतकें स्थितिमान बदललेलें नसल्यास, त्या लैसेन्सची मुदत संपण्यापूर्वी अर्जी आल्यावर व मूळ फी दिल्यावर, वाढविण्याचा अधिकार आहे.

३३. ह्या कानूंवरहुकूम दिलेला लैसेन्स हरवला असेल किंवा त्याचा यदृच्छेनें नाश झाला असेल, तेव्हां आठ आणे फी दिल्यावर त्याची दुसरी प्रत लैसेन्सवाल्यास देण्याचा अधिकार आहे.

३४. जो कोणताही मनुष्य ह्या कानूंवरहुकूम दिलेला लैसेन्स धारण करीत असेल किंवा तशा लैसेन्साअन्वयें काम करीत असेल, त्या मनुष्यास तो लैसेन्स हजर करण्याविषयीं बारी पदार्थांच्या कोणत्याहि इन्स्पेक्टरानें किंवा कोणत्याही माजिस्ट्रेटानें किंवा पोलीस ठाणें स्वाधीन असणाऱ्या कोणत्याही पोलीस अमलदारानें किंवा त्याच्याहून वरच्या दर्ज्याच्या कोणत्याही पोलीस अमलदारानें फर्माविलें असतां, त्याप्रमाणें करणें त्या मनुष्यास भाग आहे.

३५. ह्या कानूंअन्वयें काम करणाऱ्या सर्व माजिस्ट्रेटांनीं अगर इतर अधिकाऱ्यांनीं आपआपलीं कामें आपआपल्या एक्झिक्युटिव्ह वरिष्ठांच्या व स्थानिक सरकारच्या निर्बंधास पात्र राहून केलीं पाहिजेत.

३६. सदरील कानूंअन्वयें लैसेन्स देण्याचा अखत्यार मिळालेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास योग्य वाटेल तर, फलाण्या लैसेन्सचा अमल, हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८ चा ११ वा) याअन्वयें दिलेल्या तशा लैसेन्ससारखाच चालेल असें, त्या लैसेन्सावर लेखी हुकूम करून, फर्माविण्याचा त्यास अखत्यार आहे.

३७. हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८ चा ११ वा) यांत युद्धसामग्री या शब्दाची ज्याप्रमाणें व्याख्या केली आहे तशा युद्धसामग्रीच्या सदराखालीं येणारा कोणताही बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याचा ज्या कोणत्याही मनुष्यास तो आक्ट किंवा त्याअन्वयें केलेल्या कानू यांवरून कायदेशीर रीतीनें हक्क असेल, त्या मनुष्याला आपल्या स्वतःच्या खाजगी उपयोगासाठीं वाजवी मानानें तसा कोणताही बारी पदार्थ, ह्या कानूंअन्वयें लैसेन्स घेतल्यावांचून, कबज्यांत ठेवण्याचा अधिकार आहे.

---

## परिशिष्ट.

### नमुना अ.

(८ वी कानू पहा.)

फी— रुपये, स्टांपांच्या रूपानें.

**बंदुकीची दारू, किंवा ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गांतील बारी पदार्थ तयार करण्याविषयीं, विकण्याविषयीं व कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स.**

**इलाका-शहर व त्याचीं पोटगांवें यांमध्यें पोलीस कमिशनरानें आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.**

| लैसेन्स धारण करणाराचें नांव वगैरे, आणि राहण्याची जागा. | कीम चालविण्याची, कारखान्याची किंवा दुकानाची जागा. | कोणत्याही एकाच वेळीं ठेवावयाचें बारी पदार्थांचें कमाल परिमाण. | बारी पदार्थ सालांत कोणत्या प्रकारचा व किती तयार करावयाचा तें. | बारी पदार्थ सालांत कोणत्या प्रकारचा व किती कबज्यांत ठेवावयाचा व विकावयाचा तें. | ज्या तारिखेस लैसेन्सची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | तारीख ३१ माहे डिसेंबर सन १८९ . |

——————जिल्हा, ——————१८९ . (शिक्का) (सही.) ——————चा

## शर्ती.

१. हा लैसेन्स, हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्या आक्टाअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र ठेवून, दिला आहे.

२. लैसेन्स धारण करणारानें, तयार केलेल्या सर्व बारी पदार्थांचें, हातीं असलेल्या सर्व सांठ्याचें व सर्व विक्र्यांचें दफ्तर व हिशोब, हीं सरकार वेळोवेळीं फर्मावील तशा नमुन्याप्रमाणें ठेविलीं पाहिजेत.

३. लैसेन्स धारण करणारास, त्याचा सांठा आणि त्याचीं बारी पदार्थ तयार करण्याबाबदचीं व विकरीबाबदचीं बुकें, हीं दाखविण्याविषयीं कोणताही माजिस्ट्रेट किंवा इन्स्पेक्टराच्या दर्ज्याहून खालच्या दर्ज्याचा नसणारा कोणताही पोलीस अमलदार सांगेल, तेव्हां त्यानें तीं अशा अमलदारास दाखविलीं पाहिजेत.

४. सदरहू बारी पदार्थ तयार करणें तो, केवळ त्याच कामाकडे लाविलेल्या आणि कोणत्याही राहत्या घरापासून खालीं निर्दिष्ट केलेल्या अंतरावर असलेल्या एकाद्या तंबूंत किंवा सरासरी बांधलेल्या एकाद्या इमल्यांत तयार केला पाहिजे; सदरहू अंतर येणेंप्रमाणें:—

(अ) बंदुकीच्या दारूच्या बाबतींत, १०० यार्ड,

(ब) ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गांतील बारी पदार्थांच्या बाबतींत, ५० यार्ड;

आणि कोणत्याही हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक रहदारीच्या मार्गापासून, किंवा सार्वजनिक जागेपासून हींच अंतरें राखलीं पाहिजेत. लहान हत्यारांसाठीं काडतुसें भरण्याच्या बाबतींत, ती कृति एकाद्या इमारतीच्या वरील मजल्यांत चालवणें जास्त बरें वाटल्यास तसें करण्यास हरकत नाहीं: मात्र ती कृति ज्या खोलींत चाललेली असेल तींत, सेफ्टी काडतुसांमध्यें भरलेला बारी पदार्थ शिवायकरून इतर बारी पदार्थ ५ रत्तलांहून जास्त असतां कामा नये. इतर सर्व बाबतींत तो तयार करण्याचें काम एकमजली इमल्यांत चालविलें पाहिजे.

५. ह्या लैसेन्साअन्वयें होणाऱ्या बारी पदार्थांच्या सर्व विक्र्या लैसेन्सच्या पुढच्या बाजूवर दर्शविलेल्या जागीं केल्या पाहिजेत.

६. सदरहू बारी पदार्थ, जें कोणतेंही मूल १३ वर्षांहून कमी वयाचें दिसत असेल त्यास विकतां कामा नये.

७. लैसेन्सवाल्याच्या कबज्यांत असलेला बारी पदार्थ, जी कोणतीही मजबूत रीतीनें बांधलेली, ज्वालाग्राही नसणारी व स्थानिक सरकार ठरवील त्या अमल्दारानें पसंत केलेली इमारत, किंवा जी कोणतीही आगीची भीति नसणारी सेफ, कोणत्याही राहत्या घरापासून, हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक रहदारीच्या मार्गापासून, किंवा सार्वजनिक जागेपासून शर्त ४ हींत ठरविलेल्या अंतरांइतकी दूर असेल, आणि अधिकार नसलेल्या मनुष्यांस तेथें जातां न येई व बाहेरील धोक्यापासून सुरक्षित राही अशा रीतीनें बनावलेली व बंद केलेली असेल, त्या इमारतींत किंवा सेफींत ठेविला पाहिजे:

मात्र असें ठरविलें आहे कीं, ५० रत्तलांहून अधिक नाहीं इतकी बंदुकीची दारू, किंवा याप्रमाणें न ठेविलेल्या बंदुकीच्या दारूच्या प्रत्येक रत्तलाच्याबदला ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला २ रत्तल बारी पदार्थ, किंवा तितक्याच मानानें ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाचा बारी पदार्थ, राहत्या घरांत, किंवा सदरीं शेवटीं सांगितलेल्या इमारतीशिवाय इतर कोणत्याही इमारतींत, केवळ बारी पदार्थच ठेवण्याच्या कामीं लावलेल्या पात्रामध्यें, ठेवण्याचा अधिकार आहे:

आणखी असेंही ठरविलें आहे कीं ज्या कोणत्याही बारी पदार्थांत त्याचें आंगचेंच पेट घेण्याचें साधन असेल तो (६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ शिवाय करून) बारी पदार्थ आगीची भीति नसणाऱ्या सेफमध्यें ठेवतां कामा नये.

८. बारी किंवा शीघ्रज्वालाग्राही अशा प्रकारच्या सर्व जिनसा किंवा पदार्थ हीं, सदरहू बारी पदार्थापासून आणि तो ज्या कोणत्याही खोलींत किंवा इमारतीच्या भागांत, आगीची भीति नसणाऱ्या सेफींत किंवा पात्रांत असेल त्या खोलीपासून किंवा इमारतीच्या भागापासून, सेफीपासून किंवा पात्रापासून, निर्भय होई अशा अंतरावर ठेविलीं

पाहिजेत; आणि अशा खोलींत किंवा इमारतीच्या भागांत किंवा सेफींत किंवा पात्रांत जाणाऱ्या कोणत्याही मनुष्यापाशीं कोणतेंही लोखंड किंवा पोलाद असतां कामा नये, किंवा तें त्याच्या बुटांस किंवा जोड्यांस किंवा त्यांवर लाविलेलें असतां कामा नये.

९. केवळ सदरहू बारी पदार्थच तयार करण्याच्या किंवा ठेवण्याच्या कामाला लावलेल्या इमारतीच्या आणि तसेंच आगीची भीति नसणाऱ्या सेफीच्या किंवा पात्राच्या आंतल्या बाजूस (तयार करण्याच्या कामीं जरूर असलेलीं यंत्रें शिवाय करून) कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असतां कामा नये.

१०. ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील ९ रत्तलांहून अधिक असलेला सर्व बारी पदार्थ, आणि १ रत्तलाहून अधिक असलेले दुसरे सर्व बारी पदार्थ हे, ते बाहेर न निघत अशा रीतीनें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत ठेविले पाहिजेत, आणि जर ते विकण्यासाठीं उघड मांडले असतील किंवा उघड विकण्यांत येत असतील तर असे बारी पदार्थ भरलेल्या अगदीं बाहेरच्या पात्रावर, त्या बारी पदार्थांचें नांव, डागून, किंवा मजबूत रीतीनें चिठ्ठी लावून, किंवा दुसरी निशाणी करून, ढळढळीत अक्षरांनीं दर्शवलें पाहिजे.

११. जे बारी पदार्थ ह्या लैसेन्साअन्वयें ठेवण्याचा अधिकार आहे त्यांपैकीं दरेक प्रकारचे पदार्थ, एका प्रकारचे बारी पदार्थ भडका होऊन उडाले किंवा पेटले असतां त्यांच्या भडक्याचा किंवा पेटाचा संचार दुसऱ्या प्रकारच्या पदार्थांत मुळींच होणार नाहीं अशा वस्तूचा व प्रकारचा मध्यें पडदा घालून, किंवा तशी जागा मध्यें ठेवून, निराळे केले पाहिजेत. तथापि एकाच वर्गाचे बारी पदार्थ एकत्र ठेवण्यास आणि बंदुकीची दारू सेफ्टी फ्यूजींबरोबर ठेवण्यास हरकत नाहीं.

१२. * लैसन्स धारण करणारानें, आपल्या दुकानास किंवा काम करण्याच्या जागेस, हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८ चा ११ वा) याअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ११ व्या कानूंत सांगितल्या प्रकारची एक नांवाची पाटी लाविली पाहिजे, आणि आपल्या दुकानांत त्या आक्टाच्या २८ व्या कलमाची एक नकल लावून ठेविली पाहिजे.

१३. * लैसेन्स धारण करणारानें, हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८ चा ११ वा) याअन्वयें ठरविलेल्या नमुन्यांपैकीं नमुना ८ किंवा ९ याअन्वयेंचा लैसेन्स धारण करणाऱ्या प्रत्येक खरीददाराच्या लैसेन्सावर खरेदीच्या वेळीं खालील तपशिलाचा शेरा लिहिला पाहिजे:—

(अ) विकलेल्या जिनसा जो मनुष्य आपल्या स्वाधीन घेईल त्या मनुष्याचें नांव व पत्ता;

(ब) विकलेल्या जिनसांचा प्रकार व मान;

(क) विकरीची तारीख;

आणि त्या शेऱ्यावर आपली सही केली पाहिजे.

---

* हा लैसेन्स, हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८ चा ११ वा) याअन्वयें दिलेल्या तशा लैसेन्साप्रमाणें चालेल असें, हा लैसेन्स देणारा अधिकारी त्यावर हुकूम लिहून फर्मावील, तेव्हांच मात्र ह्या शर्ती दाखल कराव्या.

# नमुना व.

(८ वी कानू पहा.)

फी— रुपये, स्टांपांच्या रूपानें.

**बंदुकीची दारू, किंवा ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गांतील वारी पदार्थ विकण्याविषयीं व कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स.**

**इलाका-शहर व त्याचीं पोटगांवें यांमध्यें पोलीस कमिशनरानें आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.**

| लैसेन्स धारण करणाराचें नांव वगैरे, आणि राहण्याची जागा. | काम चालविण्याची, कारखान्याची किंवा दुकानाची जागा. | कोणत्याही एका वेळीं ठेवावयाचें वारी पदार्थाचें परमावधीचें परिमाण. | सालांत वारी पदार्थ कोणत्या प्रकारचा व किती कवज्यांत ठेवावयाचा व विकावयाचा तें. | ज्या तारिखेस लैसेन्साची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|---|
| | | | | तारीख ३१ माहे डिसेंबर सन १८९ . |

———— जिल्हा,
———— १८९ .

(शिक्का)

(सही)
————चा————

**शर्ती.**

१. हा लैसेन्स, हिंदुस्थानचा वारी पदार्थाविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्याअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र ठेवून, दिला आहे.

२. लैसेन्स धारण करणारानें दास्तानांतील सर्व वारी पदार्थांचें व सर्व विकऱ्यांचें दफ्तर व हिशोब हीं, स्थानिक सरकार वेळोवेळीं फर्मावील तशा नमुन्याप्रमाणें ठेविलीं पाहिजेत.

३. लैसेन्स धारण करणारानें, त्याचा सांठा आणि त्याचीं विकरीबाबदचीं बुकें व कागदपत्र हीं दाखविण्याविषयीं कोणत्याही माजिस्ट्रेटानें किंवा इन्स्पेक्टरच्या दर्ज्याहून खालच्या दर्ज्याचा नसणाऱ्या कोणत्याही पोलीस अमलदारानें सांगितलें असतां, तीं अशा अमलदारास दाखविलीं पाहिजेत.

४. ह्या लैसेन्साअन्वयें होणाऱ्या वारी पदार्थांच्या सर्व विकऱ्या, लैसेन्सच्या पुढल्या बाजूवर दर्शविलेल्या जागीं केल्या पाहिजेत.

५. सदरहू वारी पदार्थ, जें कोणतेंहि मूल १३ वर्षांहून कमी वयाचें दिसत असेल त्यास विकतां कामा नये.

६. वारी पदार्थ ठेवणें तो, जी कोणतीही मजबूत रीतीनें बांधलेली, ज्वालाग्राही नसणारी व स्थानिक सरकार ठरवील त्या अमलदारानें पसंत केलेली इमारत, किंवा जी कोणतीही आगीची भीति नसणारी सेफ, कोणत्याही राहत्या घरापासून, हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक रहदारीच्या मार्गापासून किंवा सार्वजनिक जागेपासून ठरीव* अंतरांइतकी दूर असेल, आणि अधिकार नसलेल्या मनुष्यांस तेथें जातां न येई व बाहेरील धोक्यापासून सुरक्षित राही अशा रीतीनें बनावलेली व बंद केलेली असेल, त्या इमारतींत किंवा सेफींत ठेविला पाहिजे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ५० रत्तल बंदुकीची दारू, किंवा याप्रमाणें न ठेविलेल्या बंदुकीच्या दारूच्या प्रत्येक रत्तलाच्या बदला, ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला २ रत्तल वारी पदार्थ, किंवा तितक्याच मानानें ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाचा वारी पदार्थ, राहत्या घरांत, किंवा सदरीं शेवटीं सांगितलेल्या इमारतीखेरीज इतर कोणत्याहि इमारतींत, केवळ वारी पदार्थच ठेविण्याच्या कामीं लावलेल्या पात्रामध्यें, ठेवण्याचा अधिकार आहे:

* बंदुकीच्या दारूच्या बाबतींत, १०० यार्ड.
६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गांतील वारी पदार्थांच्या बाबतींत, ५० यार्ड.

आणखी असेंही ठरविण्यांत येतें कीं ज्या कोणत्याही बारी पदार्थांत त्याचें आंगचेंच पेट घेण्याचें साधन असेल तो ( ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ शिवाय करून ) बारी पदार्थ आगीची भीति नसणाऱ्या सेफमध्यें ठेवतां कामा नये.

७. बारी किंवा शीघ्रज्वालाग्राही अशा प्रकारच्या सर्व जिनसा किंवा पदार्थ हीं, सदरहू बारी पदार्थापासून, आणि तो ज्या कोणत्याही खोलींत किंवा इमारतीच्या भागांत, आगीची भीति नसणाऱ्या सेफींत, किंवा पात्रांत असेल त्या खोलीपासून किंवा इमारतीच्या भागापासून, सेफीपासून किंवा पात्रापासून, निर्भय होई अशा अंतरावर ठेविलीं पाहिजेत, आणि अशा खोलींत किंवा इमारतीच्या भागांत, सेफींत किंवा पात्रांत जाणाऱ्या कोणत्याही मनुष्यापाशीं कोणतेंही लोखंड किंवा पोलाद असतां कामा नये, किंवा तें त्याच्या बुटांस अगर जोड्यांस किंवा त्यांवर लाविलेलें असतां कामा नये.

८. वर सांगितलेल्या प्रकारच्या, केवळ सदरहू बारी पदार्थच ठेवण्याच्या कामाला लावलेल्या इमारतीच्या आणि तसेंच आगीची भीति नसणाऱ्या सेफीच्या किंवा पात्राच्या आंतल्या बाजूस कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असतां कामा नये.

९. ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील ५ रत्तलांहून अधिक असलेले सर्व बारी पदार्थ, आणि १ रत्तलाहून अधिक असलेले दुसरे सर्व बारी पदार्थ हे, ते बाहेर न निघत अशा रीतीनें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत ठेविले पाहिजेत, आणि जेव्हां ते विकण्यासाठीं उघड मांडले असतील किंवा उघड विकण्यांत येत असतील तेव्हां असे बारी पदार्थ भरलेल्या अगदीं बाहेरच्या पात्रावर, त्या बारी पदार्थांचें नांव, डागून, किंवा मजबूत रीतीनें चिठी लावून, किंवा दुसरी निशाणी करून, ढळढळीत अक्षरांनीं दर्शविलें पाहिजे.

१०. जे बारी पदार्थ ह्या लैसेन्साअन्वयें ठेवण्याचा अधिकार आहे त्यांपैकीं दरेक प्रकारचे पदार्थ, एका प्रकारचे बारी पदार्थ भडका होऊन उडाले किंवा पेटले असतां त्यांच्या भडक्याचा किंवा पेटाचा संचार दुसऱ्या प्रकारच्या बारी पदार्थांत मुळींच होणार नाहीं अशा वस्तूचा व प्रकारचा पडदा मध्यें घालून, किंवा तशी जागा मध्यें ठेवून, निराळे केले पाहिजेत. तथापि एकाच वर्गाचे बारी पदार्थ एकत्र ठेवण्यास आणि बंदुकीची दारू सेफ्टी फ्यूजींबरोबर ठेवण्यास हरकत नाहीं.

११.* लैसेन्स धारण करणारानें, आपल्या दुकानास किंवा काम करण्याच्या जागेस, हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट ( सन १८७८ चा ११ वा ) याअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ११ व्या कानूंत सांगितल्या प्रकारची एक नांवाची पाटी लाविली पाहिजे, आणि आपल्या दुकानांत त्या आक्टाच्या २८ व्या कलमाची एक नकल लावून ठेविली पाहिजे.

१२.* लैसेन्स धारण करणारानें, हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट ( सन १८७८ चा ११ वा ) याअन्वयें ठरविलेल्या नमुन्यांपैकीं नमुना ८ किंवा ९ याअन्वयेंचा लैसेन्स धारण करणाऱ्या प्रत्येक खरीददाराच्या लैसेन्सावर खरेदीच्या वेळीं खालील तपशिलाचा शेरा लिहिला पाहिजे :—

(अ) विकलेल्या जिनसा जो मनुष्य आपल्या स्वाधीन घेईल त्या मनुष्याचें नांव व पत्ता;

(ब) विकलेल्या जिनसांचा प्रकार व मान;

(क) विक्रीची तारीख;

आणि त्या शेऱ्यावर आपली सही केली पाहिजे.

---

* हा लैसेन्स, हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट ( सन १८७८ चा ११ वा ) याअन्वयें दिलेल्या तशा लैसेन्साप्रमाणें चालेल असें, हा लैसेन्स देणारा अधिकारी त्यावर हुकूम लिहून फर्मावील, तेव्हांच मात्र ह्या शर्ती दाखल कराव्या.

नमुना क.

( ८ वी कानू पहा. )

फी—आठ आणे, स्टांपांच्या रूपानें.

बंदुकीची दारू किंवा ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गातील बारी पदार्थ कवज्यांत ठेविण्याविषयीं लैसेन्स.

इलाका-शहर व त्याचीं पोटगांवें यांत पोलीस कमिशनरानें आणि इतर जागीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.

| लैसेन्स धारण करणाराचें नांव वगैरे, आणि राहण्याची जागा. | सालांत बारी पदार्थ कोणत्या प्रकारचा व किती कब्जांत ठेवावयाचा तें. | जेथें बारी पदार्थ कवज्यांत ठेवावयाचा असेल ती जागा व तिचा पुरा तपशील. | कोणत्याही एका वेळीं ठेवावयाचें बारी पदार्थाचें परमावधीचें परिमाण. | ज्या तारखेस लैसेन्सची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|---|
| | | | | तारीख ३१ माहे डिसेंबर सन १८९ |

———————जिल्हा, ———————१८९ .

(शिक्का.) (सही) ———————चा

शर्ती.

१. हा लैसंन्स, हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्याअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र ठेवून, दिला आहे.

२. सदरहू बारी पदार्थ ठेवणें तो, जी कोणतीही मजबूत रीतीनें बांधलेली, ज्वालाग्राही नसणारी व स्थानिक सरकार ठरवील त्या अमलदारानें पसंत केलेली इमारत, किंवा जी कोणतीही आगीची भीति नसणारी सेफ, कोणत्याही राहत्या घरापासून, हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक मार्गापासून किंवा सार्वजनिक जागेपासून *ठरीव अंतरांइतकी दूर असेल, आणि अधिकार नसलेल्या मनुष्यांस तेथें जातां न येई व बाहेरील धोक्यापासून सुरक्षित राही अशा रीतीनें बनावलेली व बंद केलेली असेल, त्या इमारतींत किंवा सेफींत ठेविला पाहिजे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं ५० रत्तल बंदुकीची दारू, किंवा याप्रमाणें न ठेविलेल्या बंदुकीच्या दारूच्या प्रत्येक रत्तलाच्याबदला ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला २ रत्तल बारी पदार्थ, किंवा तितक्याच मानानें ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाचा बारी पदार्थ, राहत्या घरांत, किंवा सदरीं शेवटीं सांगितलेल्या इमारतीखेरीज इतर कोणत्याही इमारतींत, केवळ बारी पदार्थच ठेवण्याच्या कामीं लावलेल्या पात्रामध्यें, ठेवण्याचा अधिकार आहे.

आणखी असेंही ठरविण्यांत येतें कीं ज्या कोणत्याही बारी पदार्थांत त्याचें आंगचेंच पेट घेण्याचें साधन असेल तो ( ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ शिवाय करून ) बारी पदार्थ आगीची भीति नसणाऱ्या सेफमध्यें ठेवतां कामा नये.

३ बारी किंवा शीघ्रज्वालाग्राही अशा प्रकारच्या सर्व जिनसा किंवा पदार्थ हीं, सदरहू बारी पदार्थांपासून आणि तो ज्या कोणत्याही खोलींत किंवा इमारतीच्या भागांत, आगीची भीति नसणाऱ्या सेफींत, किंवा

* बंदुकीच्या दारूच्या बाबतींत, १०० यार्ड.

६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गांतील बारी पदार्थांच्या बाबतींत, ५० यार्ड.

पात्रांत असेल, त्या खोलीपासून किंवा इमारतीच्या भागापासून, सेफीपासून किंवा पात्रापासून, निर्भय होई अशा अंतरावर ठेविली पाहिजेत; आणि अशा खोलींत किंवा इमारतीच्या भागांत, सेफींत किंवा पात्रांत जाणाऱ्या कोणत्याही मनुष्यापाशीं कोणतेंही लोखंड किंवा पोलाद असतां कामा नये, किंवा तें त्याच्या बुटांस किंवा जोड्यांस किंवा त्यांवर लाविलेलें असतां कामा नये.

४. वर सांगितल्या प्रकारच्या, केवळ बारी पदार्थच ठेवण्याच्या कामाला लावलेल्या इमारतीच्या आणि तसेंच आगीची भीति नसणाऱ्या सेफीच्या किंवा पात्राच्या आंतल्या बाजूस कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असतां कामा नये.

५. ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील ५ रत्तलांहून अधिक असलेला सर्व बारी पदार्थ, आणि १ रत्तलाहून अधिक असलेले दुसरे सर्व बारी पदार्थ, ते बाहेर न निघत अशा रीतीनें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत ठेविले पाहिजेत.

६. जे बारी पदार्थ ह्या लैसेन्सअन्वयें ठेवण्याचा अधिकार आहे त्यांपैकीं दरेक प्रकारचे पदार्थ, एका प्रकारचे बारी पदार्थ भडका होऊन उडाले किंवा पेटले असतां त्यांच्या भडक्याचा किंवा पेटाचा संचार दुसऱ्या प्रकारच्या बारी पदार्थांत मुळींच होणार नाहीं अशा वस्तूचा व प्रकारचा मध्यें पडदा घालून, किंवा तशी जागा मध्यें ठेवून निराळे केले पाहिजेत. तथापि, एकाच वर्गाचे बारी पदार्थ एकत्र ठेवण्यास आणि बंदुकीची दारू सेफ्टी फूजींबरोबर ठेवण्यास हरकत नाहीं.

७. लैसेन्स धारण करणारा ज्या विकणारापासून खरेदी करील त्या विकणाराकडून त्यानें, खरेदीच्या वेळीं, आपल्या लैसेन्सवर खालील तपशिलाचा शेरा, त्या विकणाराच्या सहीनिशीं, लिहविला पाहिजेः—

(अ) खरीद केलेली जिन्नस जो मनुष्य आपल्या स्वाधीन घेईल त्या मनुष्याचें नांव व पत्ता ;

(ब) खरीद केलेल्या जिनसांचा प्रकार व मान;

(क) खरेदीची तारीख.

नमुना. इ.

( १४ वी कानू पहा. )

फी—पांच रुपये, स्टांपांच्या रूपानें.

बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स.

इलाका-शहर व त्याचीं पोटगांवें यांत पोलीस कमिशनरानें व इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.

| लैसेन्स धारण करणाराचें नांव वगैरे, आणि राहण्याची जागा. | काम करण्याची किंवा दुकानाची जागा. | बारी पदार्थांचा प्रकार. | कोणत्याही एका वेळीं ठेवावयाचें बारी पदार्थांचें ( ६० रत्तलांहून जास्त नाहीं असें ) परमावधीचें परिमाण. | ज्या तारिखेस लैसेन्सची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

————जिल्हा,
————१८९ .

(शिक्का.)

( सही )

————चा

## शर्ती.

१. ह्या लैसेन्स, हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्या आक्टाअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र ठेवून, दिला आहे.

२. सदरहू बारी पदार्थ ठेवणें तो, जी इमारत केवळ त्याच कामाला लावलेली असून मजबूत रीतीनें बांधलेली असेल व राहत्या घरांपासून निराळी केलेली असेल, आणि कोणत्याही हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक रहदारीच्या मार्गापासून किंवा सार्वजनिक जागेपासून, निर्भय होई अशा अंतरावर असेल, आणि अधिकार नसलेल्या मनुष्यांस तेथें जातां न येई व बाहेरील धोक्यापासून सुरक्षित राही अशा रीतीनें बनावलेली व बंद केलेली असेल, त्या इमारतींत ठेवला पाहिजे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, १६ रत्तलांहून अधिक नाहीं इतका सदरहू प्रकारचा बारी पदार्थ, सदरीं शेवटीं सांगितलेल्या इमारतीखेरीज इतर कोणत्याही इमारतींत, केवळ बारी पदार्थच ठेवण्याच्या कामीं लावलेल्या पात्रामध्यें, ठेवण्याचा अधिकार आहे.

३. बारी किंवा शीघ्रज्वालाग्राही अशा प्रकारच्या सर्व जिनसा किंवा पदार्थ हीं, सदरहू बारी पदार्थापासून, आणि तो ज्या कोणत्याही इमारतींत किंवा पात्रांत असेल त्या इमारतीपासून किंवा पात्रापासून, निर्भय होई अशा अंतरावर ठेविलीं पाहिजेत.

४. केवळ सदरहू बारी पदार्थच ठेवण्याच्या कामाला लावलेल्या इमारतीच्या आणि तसेंच सदरहू पात्राच्या आंतल्या बाजूस कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असतां कामा नये.

५. १ रत्तलाहून अधिक असलेले सदरहू प्रकारचे सर्व बारी पदार्थ, ते बाहेर न निघत अशा प्रकारें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत ठेविले पाहिजेत.

६. जे बारी पदार्थ ह्या लैसेन्सअन्वयें कायदेशीर रीतीनें ठेवण्याचा अधिकार आहे त्यांपैकीं दरेक प्रकारचे पदार्थ, एका प्रकारचे बारी पदार्थ भडका होऊन उडाले किंवा पेटले असतां त्यांच्या भडक्याचा किंवा पेटाचा संचार दुसऱ्या प्रकारच्या बारी पदार्थांत मुळींच होणार नाहीं अशा वस्तूचा व प्रकारचा मध्यें पडदा घालून, किंवा तशी जागा मध्यें ठेवून, निराळे केले पाहिजेत.

७. लैसेन्स धारण करणारा ज्या विकणारापासून खरेदी करील त्याकडून त्यानें, खरेदीच्या वेळीं, आपल्या लैसेन्सवर खालील तपशिलाचा शेरा, त्या विकणाराच्या सहीनिशीं, लिहविला पाहिजे :—

(अ) खरीद केलेल्या जिनसा जो मनुष्य आपल्या स्वाधीन घेईल त्या मनुष्याचें नांव व पत्ता ;

(ब) खरीद केलेल्या जिनसांचा प्रकार व मान ;

(क) खरेदीची तारीख.

——

## नमुना ई.

(१७ वी कानू पहा.)

फी–वीस रुपये, स्टांपांच्या रूपानें.

### बारी पदार्थ कबज्यांत ठेविण्याविषयीं लैसेन्स.

स्थानिक सरकारानें द्यावयाचा.

| लैसेन्स धारण करणाराचें नांव आणि राहण्याची जागा. | ज्या मागझीनास हा लैसेन्स लागू आहे त्याच्या स्थानाच्या जमिनीच्या सीमा. | त्या मागझीनच्या संबंधाच्या इमारती व कामें यांचें ठिकाण, प्रकार व बांधणी. | कबज्यांत ठेवावयाच्या बारी पदार्थांचा प्रकार. | त्या मागझीनांत, व त्याच्या स्थानाच्या सीमांच्याआंत, एकाच वेळीं कबज्यांत ठेवावयाच्या बारी पदार्थांचें परिमाण. | ज्या तारिखेस लैसेन्सची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

———— जिल्हा,
———— १८९ .

(शिक्का)

(सही)
———— चा

### शर्ती.

१. हा लैसेन्स, हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्याअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र ठेवून, दिला आहे.

२. बारी पदार्थ सदरहू मागझीनांत एकाच वेळीं असणें तो, ह्या लैसेन्सांत निर्दिष्ट केलेल्या मानाहून अधिक असतां कामा नये.

३. सदरहू मागझीनचा उपयोग करणें तो, ह्या लैसेन्सांत निर्दिष्ट केलेला बारी पदार्थ किंवा निर्दिष्ट केलेले बारी पदार्थ, आणि असा बारी पदार्थ किंवा असे बारी पदार्थ ठेवण्याचीं पात्रें, किंवा तो किंवा ते ठेवण्याच्या संबंधाच्या कामाकरितां लागणारीं हत्यारें किंवा आउतें, हींच फक्त ठेवण्याच्या कामीं केला पाहिजे.

४. सदरहू मागझीनची आंतली बाजू आणि त्यांतील बांक, घडवंच्या व सोई [फिटिंग] हीं, कोणतेंहि लोखंड किंवा पोलाद उघडें न राही अशा रीतीनें, आणि कोणतीही रेंव, लोखंड, पोलाद किंवा तसेच दुसरे पदार्थ हीं सुटीं होऊन सदरहू बारी पदार्थांशीं न लागत अशा रीतीनें बनावलेलीं असलीं पाहिजेत किंवा त्यांवर अस्तर किंवा आच्छादन केलेलें असलें पाहिजे, आणि अशी आंतली बाजू, बांक, घडवंच्या व सोई यांवर, वाजवी रीतीनें शक्य असेल तेथवर, रेंव राहूं देतां कामा नये व तीं इतर प्रकारें साफ ठेविलीं पाहिजेत; आणि पाणी लागल्यानें भयकारक परिणाम होण्यास पात्र आहे असा कोणताही बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याच्या बाबतींत त्या बारी पदार्थांस पाणी न लागण्याविषयीं योग्य पूर्वोपाय केले पाहिजेत.

५. सदरहू मागझीनास एक पुरेसा लैट्निंग कंडक्टर जोडकेला असला पाहिजे, आणि त्याची दरसाल निदान एकदा तपासणी केली पाहिजे.

६. एकाद्या खोलीस किंवा मागझीनास किंवा त्यांच्या कोणत्याही भागांत दुरुस्ती करण्यापूर्वी, शक्य असेल तेथवर, तेथील सर्व बारी पदार्थ किंवा त्यांचीं मिश्र केलेलीं द्रव्यें हीं तेथून साफ काढलीं पाहिजेत, आणि अशी खोली किंवा भाग हीं धुऊन अगदीं साफ केलीं पाहिजेत; आणि याप्रमाणें सफाई केल्यानंतर, या शर्ती, अशा खोलींत किंवा मागझीनच्या भागांत बारी पदार्थ पुनः नेण्यांत येई तोंपर्यंत, बारी पदार्थास लागू असण्याच्या बंद होतील.

७. ह्याप्रमाणें सफाई होण्यापूर्वी, सदरहू मागझीनच्या कोणत्याही भागांत, किंवा कोणत्याही भागाची कोणतीही दुरुस्ती करण्यांत, उपयोग करावयाचीं सर्व हत्यारें व आउतें हीं, फक्त लांकडाचीं, तांब्याचीं, किंवा पितळेचीं, किंवा दुसऱ्या कोणत्या तरी नरम धातूचीं किंवा पदार्थाचीं केलेलीं असलीं पाहिजेत, किंवा त्यांवर कांहीं निर्भय व योग्य पदार्थाचें आच्छादन केलेलें असलें पाहिजे.

८. आग, आगीच्या काड्या किंवा जेणेंकरून भडका होण्याचा किंवा आग लागण्याचा संभव असेल असा कोणताही पदार्थ किंवा जिन्नस, किंवा कोणतेंही लोखंड, पोलाद किंवा रेंव यांचा मागझीनांत प्रवेश न व्हावा ह्मणून, कामाच्या वेळीं खिसे नसणारे असे योग्य कपडे व योग्य जोडे घालून, झाडा घेऊन व इतर प्रकारें, किंवा अशाच कांहीं उपायानें, कांहीं योग्य तजवीज केली पाहिजे; परंतु आग लागण्याचा किंवा भडका होण्याचा कोणताही धोका उत्पन्न न होई अशा रीतीनें केलेला, असलेला किंवा अशा प्रकारचा कृत्रिम उजेड आंत नेण्याची या कानूवरून मनाई नाहीं.

९. कोणत्याही मनुष्यानें सदरहू मागझीनच्या कोणत्याही भागांत तंबाखू वगैरे ओढतां कामा नये.

१०. कोणा मोठ्या मनुष्याच्या समक्ष व देखरेखीखालीं असल्यावांचून, १६ वर्षांहून कमी वयाच्या कोणत्याही मनुष्यास सदरहू मागझीनांत कामास लावतां कामा नये किंवा त्यानें त्या मागझीनांत जातां कामा नये.

११. जे दोन किंवा अधिक प्रकारचे बारी पदार्थ लैसेन्स मिळालेल्या एकाद्या मागझीनांत कायदेशीर रीतीनें कबज्यांत ठेवण्याचा अधिकार असेल ते, त्यांपैकीं एका प्रकारचे बारी पदार्थ भडका होऊन उडाले किंवा पेटले असतां त्यांच्या भडक्याचा किंवा पेटाचा संचार दुसऱ्या प्रकारच्या बारी पदार्थांत मुळींच होणार नाहीं अशा वस्तूचा व प्रकारचा मध्यें पडदा घालून, किंवा तशी जागा मध्यें ठेऊन, एकमेकांपासून निराळे ठेवावयाचे असल्यास, एकाच मागझीनांत नेण्याचा अधिकार आहे: मात्र हा ठराव खालीं लिहिलेल्या अपवादांस पात्र आहे:—

(अ) १ (बंदुकीची दारू), २ (नैट्रेट मिक्श्चर), ३ (नैट्रो-कांपौंड) आणि ४ (क्लोरेट-मिक्श्चर) या वर्गांचे निरनिराळे बारी पदार्थ, ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या पहिल्या भागांतील सेफ्टी फूज्जी, आणि ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील निरनिराळ्या बारी पदार्थांपैकीं ज्यांच्या-मध्यें कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद नसेल ते, दर्म्यान कोणताही पडदा घातल्यावांचून किंवा जागा ठेवल्यावांचून, एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

(ब) ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील निरनिराळे बारी पदार्थ, दर्म्यान कोणताही पडदा घातल्यावांचून किंवा जागा ठेविल्यावांचून, एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

(क) ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील निरनिराळ्या बारी पदार्थांपैकीं ज्यांच्यामध्यें कोण-तेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असेल ते, दर्म्यान कोणताही पडदा घातल्यावांचून किंवा जागा ठेविल्यावांचून, एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

(ड) ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या ३ ऱ्या भागांतील निरनिराळे बारी पदार्थ, दर्म्यान कोणताही पडदा घातल्यावांचून किंवा जागा ठेवल्यावांचून, एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

(इ) ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाचे निरनिराळे बारी पदार्थ, दर्म्यान, कोणताही पडदा किंवा जागा ठेवल्या-वांचून एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

वर सांगितले आहेत ते खेरीज करून, दोन किंवा अधिक प्रकारचे बारी पदार्थ एकाच मागझीनांत ठेवतां कामा नयेत.

१२. लैसेन्सवाल्यानें व सदरहू मागझीनांत किंवा त्याच्या आसपास काम करणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें, त्या मागझीनांत आगीपासून किंवा भडका होऊन अपाय न होऊं देण्याविषयीं, आणि अधिकार नसलेल्या मनुष्याचा त्या मागझीनांत किंवा त्यांतील बारी पदार्थांकडे प्रवेश होऊं न देण्याविषयीं सर्व योग्य पूर्वोपाय केला पाहिजे. जें कृत्य, आग किंवा भडका उत्पन्न करण्यासारखें असेल आणि जें अशा मागझीनांतील कामाच्या कारणासाठीं वाजवी रीतीनें जरूर नसेल, तसें कोणतेंही कृत्य करतां कामा नये.

नमुना फ.

( २३ वी कानू पहा. )

फी—पांच रुपये, स्टांपांच्या रुपानें.

बारी पदार्थ विकण्याविषयीं लैसेन्स.

इलाका-शहरांत आणि त्याच्या पोटगांवांत पोलीस कमिशनरानें आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.

| लैसेन्स धारण करणाराचें नांव वगैरे, आणि राहण्याची जागा. | काम करण्याची किंवा दुकानाची जागा. | विकावयाच्या बारी पदार्थाचा प्रकार. | ज्या तारिखेस लैसेन्सची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|
| | | | |

———— जिल्हा }
———— १८९ . }

(शिक्का.)

( सही )
———— चा ————

शर्ती.

१. हा लैसेन्स, हिंदुस्थानचा बारी पदार्थाविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्याअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र ठेवून, दिला आहे.

२. लैसेन्स धारण करणारानें दारूखानांतील सर्व बारी पदार्थांचें व सर्व विक्र्यांचें दफ्तर व हिशोब हीं, सरकार वेळोवेळीं फर्मावील तशा नमुन्याप्रमाणें ठेविलीं पाहिजेत.

३. बारी पदार्थ विकणें तो, जें कोणतेंही मूल १३ वर्षांहून कमी वयाचें दिसत असेल त्यास विकतां कामा नये.

४. वजनानें १ रत्तलाहून अधिक असणारे बारी पदार्थ जेव्हां विकण्यासाठीं उघड मांडले असतील किंवा उघड विकण्यांत येत असतील तेव्हां ते सर्व, ते बाहेर न निघत अशा रीतीनें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत असले पाहिजेत. आणि असे बारी पदार्थ भरलेल्या अगदीं बाहेरच्या पात्रावर, त्या बारी पदार्थाचें नांव आणि त्यापुढें " बारी पदार्थ " हे शब्द, डागून, किंवा मजबूत रीतीनें चिठ्ठी लावून, किंवा दुसरी निशाणी करून, ढळढळीत अक्षरांनीं दर्शविले पाहिजेत.

आलीजाह नेक नामदार गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

जे. मॉन्टीथ,

चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

## रेव्हिन्यु डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २९ माहे सप्टेंबर सन १८९७.

नंबर ७१९८.—हिंदुस्थान सरकारचा खालीं दिलेला जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असे :—

"फिनान्स अॅण्ड कॉमर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हिन्यु.

स्टांप.

मुक्काम सिम्ला, तारीख २३ माहे सप्टेंबर, सन १८९७.

नंबर ४२७६–एस्. आर्.—सन १८७० चा कोर्टाचे फीचा आक्ट (सन १८७० चा ७) याच्या ३१ व्या कलमांत दिलेले अधिकार चालवून, आली जनाब गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे असें फर्मावितात कीं, हिंदुस्थान सरकारचा फिनान्स अॅण्ड कॉमर्स डिपार्टमेंटांतील जाहिरनामा नंबर ४६५०, तारीख १० माहे सप्टेंबर सन १८८९, भाग अ यांत रकम (१९) हिच्यानंतर खालील मजकूर दाखल करावा. तो येणेंप्रमाणें :—

'(१९-अ) स्टांप विकण्याकरितां लैसेन्स मिळण्याबद्दल केलेल्या अर्जावर पडणारी फी रद्द केली आहे.'

(सही) जे. एफ्. फिन्ले,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह नेक नामदार गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

जे. मॉण्टीथ,

चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS